# शिक्षकांसाठी सूचना प्रथम भाषा : मराठी – इ. चौथी

## संकलित मूल्यमापन २ : २०१७–१८

### इयत्ता – चौथी, विषय : मराठी

| लेखी | तोंडी | एकूण गुण |
|---|---|---|
| ३० | १० | ४० |

**शिक्षकांसाठी महत्त्वाचे :**

- शासन निर्णय दि. १४ जुलै २०१७ नुसार 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमातील चाचण्यांतून त्या त्या इयत्तांच्या क्षमतांबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याने शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत क्षमतांच्या संपादणुकीची पडताळणी करणे आवश्यक आहे.
- राज्यात '१००% विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम' कार्यान्वित झाला आहे. या कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याला मूलभूत वाचन क्षमता प्राप्त होण्यासाठी विद्यार्थिनिहाय कृती कार्यक्रम घेण्यात येत आहे. संकलित चाचणी–२ द्वारे त्या त्या इयत्तेच्या क्षमतांबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याची मूलभूत वाचन क्षमता पडताळून पाहणे अपेक्षित आहे.
- इयत्ता दुसरी ते आठवीच्या प्रश्नपत्रिकांमध्ये प्रकट वाचनासाठी दिलेले उतारे प्रत्येक विद्यार्थ्याच्या केवळ मूलभूत वाचन क्षमतेची पडताळणी करण्यासाठी आहेत. शिक्षक सूचना पत्रिकेत दिलेल्या निकषानुसार त्यासाठी गुणदान करावे.
- प्रत्येक इयत्तेत मूलभूत वाचन क्षमतेसाठी ५ गुण (मोठ्या आवाजात वाच) व मूलभूत लेखन क्षमतेसाठी ५ गुण (शब्द ऐकून लिही) असे एकूण १० गुण मूलभूत क्षमतांवर आधारित प्रश्नांसाठी आहेत.
- इयत्तानिहाय समजपूर्वक वाचन क्षमता तपासण्यासाठी स्वतंत्र गद्य/पद्य उतारा देण्यात आला आहे. तो प्रत्येक मुलाला वाचायला द्यावा व शिक्षक सूचना पत्रिकेतील निकषानुसार गुणदान करावे.

## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्र. १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट :** जोडाक्षरविरहित व जोडाक्षरसहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द मोठ्याने व स्पष्ट वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्यांना शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) कागद | २) खजिना |
| ३) वैभव | ४) जंगल |
| ५) माणूस | ६) संध्याकाळ |
| ७) शक्ती | ८) प्रयोग |
| ९) पवनचक्की | १०) गॅरेज |

**गुणदान :** **प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**
हा प्रश्न तपासताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावा. उदा. 'वैभव' ऐवजी /'वयभव' /'गॅरेज' ऐवजी 'ग्यारेज', 'शक्ती' ऐवजी 'शकती' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्र. २) खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ) (२)** हजारीबाग (गुण १)

**ब)** आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बिरसाने वेळोवेळी जनआंदोलन केले. इंग्रजी सत्ता मुळासकट उखडून टाकण्याचा संकल्प केला. आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला. (एक बाब लिहिल्यास १ गुण व यांपैकी दोन बाबी लिहिल्यास २ गुण द्यावेत.) (गुण २)

**क)** आदिवासींना गुलाम बनवून ठेवले होते. वन-कायदा करून आदिवासींचा जंगलावरचा पारंपरिक अधिकार नाकारला होता म्हणून. (यापैकी एक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा) (गुण २)

**प्र. ३) खालील जाहिरात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**अ)** विद्यानिकेतन विद्यालय मैदान, जळगाव. (गुण १)

**ब)** सहा दिवस (गुण २)

**क)** रांगोळी स्पर्धा, वैयक्तिक गीतगायन स्पर्धा, वैयक्तिक नृत्य स्पर्धा, कथाकथन, वेशभूषा, एकांकिका. (गुण २)
(यांपैकी ४ स्पर्धा लिहिल्यास २ गुण द्यावेत.)

**प्र. ४) खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**अ)** आई म्हणाली, ''अरे राजा, एक छोटंसं काम करशील का रे?'' (गुण १)
(स्वल्पविराम व प्रश्नचिन्ह दिल्यास प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण)

**ब)** रमेश ताईसोबत बागेत फिरत होता. फिरता फिरता बागेतील फुलांचे निरीक्षण करीत होता. शेजारच्या विक्रेत्याजवळील खेळण्यांचे त्याला कुतूहल वाटले. (गुण २)

**क)** म्हणतात ना - नाचता येईना अंगण वाकडे. (गुण २)

**प्र. ५) खालील चित्र पहा आणि त्यावर आधारित गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्‌दिष्ट :** मुलांची अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | चित्राच्या तपशीलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |
| ४ | चित्राच्या तपशीलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ३ | संपूर्ण चित्राचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले अर्थपूर्ण लेखन, पण गोष्ट असेल असे नाही. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| १ | यांत्रिकरीत्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |

**प्र. ६) खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्‌दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | गोष्टीची सुरुवात लक्षात घेऊन सुसंगत मध्य आणि शेवट आहे. गोष्ट खुलविण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहेत. |
| ४ | गोष्टीला सुसंगत मध्य आणि शेवट आहे. मात्र एकूण गोष्ट त्रोटक आहे. पात्रे, संवाद, भूमिका यांचा फारसा विचार केलेला नाही. |
| ३ | गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र लिखाणात फारसे नियोजन केलेले नाही. त्यामुळे लेखन विस्कळीत वाटते. |
| २ | पूर्ण वाक्यांत आणि दिलेल्या शब्दांशी संबंधित पण त्रोटक (एक किंवा दोन वाक्यांत) अभिव्यक्ती. |
| १ | गोष्टीच्या सुरुवातीचा संदर्भ घेऊन वर्णन करण्याचा प्रयत्न. वाक्यरचना नीट नाही, त्यामुळे संपूर्ण अर्थबोध नाही. |
| ० | गोष्टीच्या सुरुवातीचा विचार न करता केलेले असंबद्‌ध लिखाण. |

## तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्र. ७) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**उद्‌दिष्ट :**

- हा प्रश्न विद्यार्थ्यांची मूलभूत वाचन क्षमता तपासण्यासाठी आहे.

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून घ्यावयाचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसांत चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच.**

**उतारा :**

**समीर चेंडू उडवत होता; खाली येणारा चेंडू हातांनी पकडत होता. एकदा, दोनदा चेंडू पकडला आणि समीरला खूप आनंद झाला. त्याला वाटलं आणखी उंच उडवावा चेंडू, मग उडवला तसा. चेंडू वेगानं खाली आला. समीर तयारीतच होता. त्याने तो बरोबर पकडला. तो खूप आनंदी झाला. त्याला वाटलं आईला, बाबांना आणि ताईला दाखवावं. ते खूश होतील आणि मला शाबासकी देतील.**

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | उताऱ्याचे योग्य गतीने पूर्णविराम व स्वल्पविरामचिन्ह लक्षात घेऊन वाचन. |
| ४ | काही वाक्यांचे पूर्णविराम चिन्ह लक्षात घेऊन केलेले वाचन. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा व अर्थाचा बोध होत नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध होत नाही. |
| ० | उतारा वाचण्यात रस दाखविला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |

**प्र. ८) खालील उताऱ्याचे वाचन करून घेणे.** (गुण ५)

**उद्दिष्ट :**

- हा प्रश्न मुलाची समजपूर्वक वाचन क्षमता तपासण्यासाठी आहे.

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारावयाचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसांत चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू द्यायची.**

**उतारा :**

**एकदा एका राजाने अकबर बादशहाला पत्र पाठविले, की 'चार महिन्याच्या आत घडाभर अक्कल पाठवून द्यावी, नाही तर हार मान्य करून पाच हजार मोहरा पाठवून द्याव्यात.'**

**बादशहाने हे काम बिरबलाला सांगितले. बिरबलाने एक मातीची घागर आणली. बागेतील भोपळ्याच्या वेलाला नुकतेच लागलेले फळ बिरबलाने घागरीत सोडले. काही दिवसांनी भोपळा मोठा झाला. बिरबलाने तोंड बंद करून ती घागर बादशहाकडे नेली. तो बादशहाला म्हणाला ही घ्या घडाभर अक्कल. बादशहाचा दूत ती घागर घेऊन त्या राजाच्या दरबारात गेला आणि त्या राजाला म्हणाला, घडा भरून अक्कल घेऊन आलो आहे. घागर न फोडता ती काढून घ्यावी. हे न जमल्यास दहा हजार मोहरा द्याव्यात. राजाने हार पत्करून दहा हजार मोहरा पाठवून दिल्या.**

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

- उत्तरे शोधण्यासाठी उतारा परत वाचण्याची संधी मुलास द्यावी.

| | योग्य उत्तर | गुण |
|---|---|---|
| **अ) मातीची घागर कोणी आणली?** | (२) | (१) |
| १) राजाने  २) बिरबलाने  ३) बादशहाने | | |
| **ब) राजाने अकबर बादशहाला कशाची मागणी केली होती?** | | (२) |
| राजाने घडाभर अक्कल मागितली, नाही दिली तर पाच हजार मोहरा द्याव्यात, अशा आशयाचे उत्तर स्वीकारावे. (प्रत्येक बाबीस एक गुण द्यावा.) | | |
| **क) राजाने हार का पत्करली?** | | (२) |
| राजाला घागर न फोडता घागरीतील अक्कल काढून घेता आली नाही या आशयाचे उत्तर स्वीकारावे. | | |

■■■